Aayushi International Interdisciplinary Research Journal (AIIRJ)
VOL- VIII ISSUE- I JANUARY 2021 PEER REVIEW e-JOURNAL IMPACT FACTOR 7.149 ISSN 2349-638x

# पर्यावरण आणि मानवी जीवन

**डॉ. संगीता गोविंदराव घार**
जयक्रांती कला आणि वाणिज्य वरिष्ठ महाविद्यालय, लातूर

पृथ्वीवर सर्वात बुद्धिमान जर कोण असेल तर तो म्हणजे मानव असून मानवाला मिळालेली अनमोल लय सर्विस देणगी जर कोणती असेल तर ती पर्यावरण होय पर्यावरण निर्माण होण्यासाठी हजारो वर्षाचा कालावधी लागलेला आहे प्राचीन काळापासून मानवाने पर्यावरणाचा स्वीकार केलेला आहे पण सोळाव्या शतकापासून मानवाने आपल्या बुद्धिमत्तेचा वापर करून पर्यावरणाचा जसा आहे तसा आपला विकास साधून घेतला आहे मात्र परतफेड करण्याचे तो साफ विसरला आहे. पर्यावरणाची नासधूस करण्यास सुरुवात केली म्हणूनच आज पर्यावरण वाचवा किंवा पर्यावरण संरक्षण काळजी काळाची गरज असे प्रश्न मानवासमोर उभारलेले आहेत.

**उद्दिष्टे**

१) पर्यावरणाची संकल्पना समजून घेणे
२) पर्यावरण आणि मानवी जीवन यामधील सहसंबंध आहे का
३) पर्यावरण प्रदूषणाचा प्रदूषणाची कारणे आणि दुष्परिणाम
४) पर्यावरण संरक्षण व उपायोजना

पर्यावरणाच्या अनेक व्याख्या मधून आपणास असे लक्षात येईल की परी अधिक आवरण बरोबर पर्यावरण होय परी म्हणजे सर्व बाजूंनी असलेले आवरण ते पर्यावरण होय पर्यावरण एक व्याख्या व्यापक शब्द आहे पर्यावरण म्हणजे सजीवांच्या किंवा जनसमुदायाच्या जीवन वाढ विकास मृत्यू परिणाम करणारी सर्व परिस्थिती आणि तिची घटके कारण त्यांचा प्रभाव होय.

या अनुषंगाने पर्यावरणाचे दोन प्रकार पडतात

१) नैसर्गिक पर्यावरण
२) सांस्कृतिक पर्यावरण

नैसर्गिक पर्यावरण निसर्गनिर्मित घटक उदा. हवा पाणी मुद्रा इत्यादीचा समावेश होतो नैसर्गिक पर्यावरणात दोन प्रकार पडतात एक जैविक घटक दोन अजैविक घटक जैविक घटक वनस्पती प्राणी यांचा समावेश शिवाय वृक्ष झुडपे सागर वेली शेवाळ इत्यादी वनस्पती घटक आहेत सूक्ष्मजीव जंतू पक्षी मासे अजैविक घटक समुद्रावरून जलावरण वातावरण इत्यादीचा समावेश होतो सांस्कृतिक पर्यावरण लोक वस्ती रस्ते इमारती दळणवळण संदेशवहन मानवनिर्मित बाबींचा समावेश होत असतो पर्यावरण म्हणजे निसर्गाची रचना यंत्रणा गणिती पद्धतीचे आहे तिच्यामध्ये नियंत्रणाची एक जबरदस्त शैली आहे तिचे नियम पाळले तरच मानवी जीवन सुखी समाधानी व सुरक्षित राहू

शकेल पर्यावरणाच्या सर्व घटकांमध्ये सतत क्रिया-प्रतिक्रिया घडत असतात त्यांचे नियम पाळणे गरजेचे असते परंतु मानवाच्या अति स्वार्थी वर्तनामुळे पर्यावरणातील समतोल बिघडत जात आहे पर्यावरणाचे जतन करणे ही प्रत्येकाची जबाबदारी आहे.ज्या प्रकारे कुटुंबातील प्रत्येक व्यक्ती कुटुंबास सुख-समृद्धी आणि स्थिरता दिसून येत दिसून येते कुटुंबातील एक तरी व्यक्ती बेजबाबदारपणे वाईट वागला तर त्याचे फळ भोगावे लागते त्याचप्रमाणे पर्यावरणाचेही आहे, म्हणून पर्यावरणात इंधन कमी करणे जंगलतोड थांबवणे वृक्षाचे साधन करणे शहरीकरणाचे शास्त्रशुद्ध नियोजन करणे आरोग्य व्यवस्था बळकट करणे असे केल्यास सर्वांना याचा योग्य असा लाभ मिळेल पर्यावरणातील हवा पाणी अन्न हे घटक सुद्धा असतील तर आपले व इतर सर्व सजीवांचे जगणे आरोग्यवर्धक व शक्तिवर्धक राहू शकेल आपण हवा व प्राण्याप्रमाणे सकल पौष्टिक अन्नाची व निरोगी प्रदूषित जमिनीची काळजी घेतली पाहिजे यासाठी प्रत्येक भागात पर्यावरणाचे व्यवस्थापन करणे पर्यावरणाचा विकास करणे आवश्यक जे प्रमाण पर्यावरण आपल्या गरजांची पूर्तता करते आपल्याला जगवते त्याचे भविष्यकालीन पिढयासाठी रक्षण करते. पर्यावरण समृद्ध करणे हे आपले प्रथम कर्तव्य आहे. पर्यावरणाचे आपण वारसदार आहोत आपणाला जगवणारा जगणारा जन्म देणारा घटक म्हणून पर्यावरणास ओळखले जाते म्हणून त्याचे कायमस्वरूपी व्यवस्थापन नियोजन करणे आपले कर्तव्य आहे या कर्तव्यात जंगले जमीन हवा पाणी वनस्पती प्राणी खनिजे यांचे संवर्धन रक्षण करणे गरजेचे आहे, परंतु मानवाकडून नैसर्गिक साधनसामग्रीचा अमर्याद वापर केला जात आहे त्यातूनच वाढत्या कारखाना दाटीमुळे प्रदूषणाचे अनेक प्रश्न निर्माण झाले आहेत पर्यावरणाचे संतुलनासाठी सर्वांनीच सामुहिकपणे प्रयत्न करण्याची गरज आहे यासाठी संयुक्त राष्ट्र संघाने जगातील सर्व लोकांची पर्यावरणाचे समस्येकडे लक्ष वेधून घेण्यासाठी त्यांच्यात जागृती निर्माण करण्यासाठी 22 मार्च हा ‘वनदिन’ व 5 जून ‘जागतिक पर्यावरण दिन’ 16 सप्टेंबर ‘ओझोन दिन’ 28 सप्टेंबर ‘हरित ग्राहक दिन’ म्हणून साजरा केला जातो. एकविसाव्या शतकाचा विचार करता वातावरणातील तापमान 3.5 सेंटीग्रेड ते दहा सेंटीग्रेड ने वाढू शकेल एकविसाव्या शतकात वातावरणातील तापमान वाढण्याचे प्रमाण जास्त आहे अशाच प्रकारे जर राहिला तर तापमानाचा परिणाम पावसाच्या प्रमाणावर होण्याची अंदाज व्यक्त केला जात होता .

भारतच पर्जन्यमानात खूप चढ होऊन पूर दुष्काळी परिस्थितीचा सामना करावा लागत आहे भारतात काही ठिकाणी म्हणजे उदाहरणात मराठवाड्यात कमी पाऊस पडल्याने दुष्काळाची स्थिती निर्माण झालेली आढळून आली होती शिवायकाही ठिकाणी ड्रोननेपाणी आणलेले आहे. काही भागात ग्लोबल वॉर्मिंगचा परिणाम म्हणावा लागेल उदाहरणात पूर्व किनारपट्टीवर नदी तलावाच्या वाढत्या प्रदूषणामुळे पिण्याचे पाणी अंतर्गत मासेमारी भयानक संकट कोसळले आहे

यामुळे मच्छिमारांची स्थलांतर अटळ आहे कलकत्ता जवळ सालार सरोवराची सर्वत्र अशी अनेक सरोवरे निर्माण होण्याचा धोका आहे. सांडपाणी ,कीटकनाशकाचा वापर खते ,साल्ट अशा अनेक कारणांमुळे सागर सरोवर महासागर नदी-नाले धोक्यात येत होते ओळखूनच मानव आणि वेळीच पर्यावरण संरक्षणाबाबत सक्रिय राहिले पाहिजे सूक्ष्मजीव वनस्पती प्राणी यामधील जैवविविधता जतन केली पाहिजे कारण जैवविविधता काही देशाला वरदानच ठरलेली आहे यात पशुपक्षी सूक्ष्मजीव यांची विपुलता अधिक आढळते भारत हा जैवविविधता संपन्न देश आहे जैवविविधतेचा संतुलित वापर करून तो बलशाली बनू शकतो यासाठी जैवविविधता संपुष्टात येणार नाही याची काळजी घ्यावी लागते शिवाय पर्यावरणाची स्थिती सुधारण्यासाठी पर्यावरणाचा विविध घटकांना प्रदूषणमुक्त ठेवणे गरजेचे आहे यासाठी दरवर्षी आपण ५ जून हा दिवस ‘जागतिक पर्यावरण दिन’ म्हणून यातून पर्यावरणाची गुणवत्ता समस्या संवर्धनात संवर्धन याविषयी आपण नेहमी जागरूक राहून कार्य करावे जेणेकरून पर्यावरणात कोणतीही हानी होणार नाही. आपण अन्नाशिवाय एखादा दिवस पाण्यापासून एखादा तास जिवंत राहू शकतो पण हवेतील ऑक्सिजन शिवाय आपण क्षणभर सुद्धा जिवंत राहू शकत नाही आणि या प्राणवायूची निर्मितीच पर्यावरणात होत असते म्हणून या पर्यावरणातील परिसरात वृक्ष लागवड करावी हवा शब्द ठेवण्याचे कार्य करावे हवा शुद्ध ठेवण्याचे कार्य करावे जेणेकरून पूर्ण पर्यावरण स्वच्छ राहण्यास मदत होईल

**सारांश**

वरील विवेचनावरून आपणास असे निश्चित होते की पर्यावरणाची संरक्षण संवर्धन करणे ही प्रत्येकाची जिम्मेदारी आहे प्रत्येकाने एक शपथ घ्यावी एक मूल एक झाड याप्रमाणे कार्य करत राहिल्यास पर्यावरण एकदम सुख सफल संपूर्ण होण्यास वेळ लागणार नाही आणि मानव जीवन निरोगी आनंदमयी जीवन सतत जगत राहिल. पर्यावरण संरक्षण प्रत्येकाचे कर्तव्य आहे या जाणिवेतून सक्रीय बनल्यास पर्यावरणाची गुणवत्ता उंचावण्यास मदत होईल यात काही शंकाच राहणार नाही .

**संदर्भसूची :**

१) पर्यावरण शास्त्र - डॉ. बाबरे मोहन
२) पर्यावरण समस्या निराकरण व क्षेत्र अभ्यास - कार्लेकर
३) पर्यावरण भूगोल - प्रा. शेट्टी
४) पर्यावरण भूगोल शास्त्र - डॉ. विठ्ठल घारपुरे
५) संपूर्ण पर्यावरणशास्त्र - प्रा.चौधरी